# कोरोनाकाळातील कचरा वेचक महिलांची स्थिती

प्रा. किरण नाईकनवरे

श्री सिध्दीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे

विभाग : समाजशास्त्र

**सारांश :**

२०२० हे वर्ष 'कोरोना' नावाचे अभूतपूर्व संकटे घेऊन आले. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण जगभरात एक दहशत पसरली आहे. कारण कोरोना सारख्या महामारीने संपूर्ण मानवी जीवनावर आक्रमण केले आहे. अनेक प्रकारच्या उपाययोजनांच्या माध्यमांतून कोरोनाला आटोक्यात आणण्याचे भले मोठे प्रयत्न जागतिक पातळीवर सुरु झाले. भारतात कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी टाळेबंदीचा पर्याय निवडण्यात आला. टाळेबंदीमुळे प्रत्येकाच्या दैनिक जीवनात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे कचरा वेचकांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागले.

**बीज संज्ञा :** कोरोना, कोव्हिड-१९, कचरा, कचरा वेचक

**प्रस्तावना :**

कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे कोणतीही पूर्वसूचना न देता भारतात शासनामार्फत अचानक टाळेबंदी लागू झाली. सर्व प्रकारचे उद्योग, दुकाने, शिक्षणसंस्था, थिएटर, मॉल्स बंद पडले. काहींना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या, काहींचे व्यवसाय ठप्प झाले, तर काहींचे वर्क फ्रॉम होम सुरु झाले. विद्यार्थ्यांचे शाळा, महाविद्यालये बंद झाली. परीक्षा रद्द झाल्या. नंतर मात्र ऑनलाइन स्वरूपात शैक्षणिक कामकाज सुरू झाले. अनेकांना भरपूर रिकामा वेळ मिळाला तर अनेकांचा वेळ कुटुंबातील सर्व सदस्य घरात असताना घर कामात जाऊ लागला. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे देशातील सर्वच क्षेत्रांमध्ये अनेक तऱ्हेचे बदल घडून आले. शासनाने गरज असेल तरच बाहेर पडण्याचे आवाहन यावेळी केलं होते. या रोगावर उपाययोजना म्हणून नाकाला आणि तोंडाला मास्क बांधणे, वेळोवेळी सॅनिटायजर किंवा साबणाने हात धुणे, हस्तांदोलन न करणे, सामाजिक अंतर ठेवणे, गर्दीच्या ठिकाणी न जाणे किंवा गर्दी न करणे असे उपाय सांगितले.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर भारतात जी टाळेबंदी घोषित करण्यात आली. त्याचा थेट परिणाम असंघटित क्षेत्रातील कामगारांवर झाला. टाळेबंदीचा निर्णय घेताना शासनाकडून कामगार वर्गाकडे विशेषतः असंघटित कामगारांकडे दुर्लक्ष झाले. भारतात जवळपास ९०% कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करणारे आहेत. अशा परिस्थितीत असंघटित कचरा वेचकांचे संपूर्ण आयुष्य उध्वस्त झाले. त्याच बरोबर त्यांना अतिशय असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागला. कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे कचरा वेचक महिलांपुढे निर्माण झालेल्या समस्या या आव्हानात्मक आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि टाळेबंदीचा कचरा वेचक महिलांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे कचरा वेचक महिलांसमोर निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

१) कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे कचरा वेचक महिला बेरोजगार झाल्या.

२) कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे कचरा वेचक महिलांचे अनेक सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झाले.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन निबंधात द्वितीय स्त्रोतांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे. या द्वितीय स्त्रोतात वर्तमान पत्रे, मासिके, इंटरनेट, समाज माध्यमे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :**

कोरोना काळामध्ये टाळेबंदीने अनेक क्षेत्रांना प्रभावित केले. त्याचा प्रभाव गरीबांपासून श्रीमंत या सर्वांवर पडला. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे देशात अचानक जाहीर झालेल्या टाळेबंदीमुळे विविध राज्यातील असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार आणि मजूर वर्ग यांच्यासमोर बेकारीची मोठी समस्या निर्माण झाली. हजारो कामगारांना आपल्या

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN No. 2454-8731

उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करण्याची आवश्यकता निर्माण झाली. कारण अचानक जाहीर झालेल्या टाळेबंदीमुळे असंघटित क्षेत्रातील कामगार आणि मजूर वर्ग कोरोनामुळे आर्थिक संकटात सर्वप्रथम भरडला गेला. हातावर पोट असलेल्या अनेक मजुर वर्गांना कोरोनामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. हातगाडीवाले मजूर, रिक्षाचालक, घरकाम करणाऱ्या महिला, बांधकाम क्षेत्रात काम करणारे गवंडी, साफ-सफाई करणारे कामगार, कंत्राटी कामगार, कचरा वेचक यांचे होणारे हाल ही एक चिंतेची बाब आहे.

शहरी गरीब लोकांमध्ये सर्वाधिक असुरक्षित असलेला वर्ग म्हणजे असंघटित कचरा वेचक वर्ग. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सोशिक असलेला हा वर्ग ज्यांच्याकडे आर्थिक उत्पन्नासाठी इतर कोणतेही स्त्रोत नाही. शहरांमध्ये आपल्या उदरनिर्वाहासाठी कचरा वेचणाऱ्या महिला या असंघटित क्षेत्रातून काम करताना आढळतात. प्रामुख्याने या कामासाठी कोणत्याही प्रकारच्या विशेष कौशल्याची गरज नाही, वयाची अट नाही. मोठ्या प्रमाणात महिला या व्यवसायात गुंतलेल्या दिसून येतात. कचरा वेचण्याचे काम हे अतिशय जोखमीचे व धोकादायक अशा स्वरूपाचे काम आहे. कारण कचरा वेचण्यासाठी कचरा वेचकांना संपूर्ण शहरात हिंडावे लागते. हा वर्ग प्रामुख्याने वस्तीमध्ये राहणारा आहे. कचरा वेचक महिला शहरातील कचरा गोळा करून संपूर्ण शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडतात. शहरातील कचरा व्यवस्थापनात या कचरा वेचक महिलांचा अतिशय मौलाचा आणि खारीचा वाटा आहे. त्याच बरोबर शहराची अर्थव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था व सुरक्षितता आणि हवामानातील शाश्वतता टिकून ठेवण्यासाठी या कचरा वेचक महिला मोठ्या प्रमाणात हातभार लावतात. कचरा वेचक महिला प्रतिदिन रस्त्यावरून, कचरा कुंड्यामधून, डम्पिंग ग्राउंडमधून कचरा वेचतात आणि त्यातून प्लास्टिक, काचा, बाटल्या, पत्रे, लोखंड, भंगार बाजूला काढून त्याची विक्री करतात. त्यातून मिळालेल्या पैशाने स्वतःचे आणि स्वतःच्या कुटुंबाचे पोट भरतात. कचऱ्यात काम करताना असंघटित कचरा वेचक महिलांना अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. कचरा हाताळताना त्यांना संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असते. कचरा कुंडीत वाकून कचरा शोधताना त्यांना शारीरिक जखमा होण्याची शक्यता असते. तर कधी एखाद्या विषारी प्राण्यांकडून दंश होण्याची

देखील शक्यता असते. त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे त्यांच्यामध्ये प्रतिकारक शक्ती देखील कमी असलेली दिसून येते. ते प्रतिदिन रोजीरोटीसाठी भटकतात. तेव्हा त्यांना आपल्या कुटुंबियांच्या आणि स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी काही पैसे मिळतात. पहाटे पाच वाजल्यापासून ते रात्री १० पर्यंत श्वास कोंडणारी दुर्गंधी, जीवघेण्या वासातून हे कचरा वेचक कचऱ्यातून आपली भाकरी शोधणारे हे कचरा वेचक कायमच दुर्लक्षित राहिलेले आहेत. टाळेबंदीच्या काळात या महिलांची स्थिती आणखीनच वाईट झाली.

मात्र कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शहरातील कचरा वेचक महिलांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागले. त्यांच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला. या मुळे हे कामगार आणखीनच मोठ्या प्रमाणात गरिबीच्या गर्तेत फसले गेले. या कचरा वेचक महिलांना त्यांच्या कष्टाच्या मानाने मिळणारा मोबदला हा कमीच आहे. त्या मोबदल्यावरच त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अवलंबून राहावे. मात्र कोरोना काळात शहरातील कचरा वेचणाऱ्या महिलांना अनेक प्रकारच्या आर्थिक धोक्यांचा सामना करावा लागला. कारण अचानक जाहीरझालेल्या टाळेबंदीमुळे देशातील सर्वच व्यवहार ठप्प झाले. त्यामुळे कोरोना काळात टाळेबंदी लागल्यापासून कचरा वेचणाऱ्या महिला या कचरा गोळा करण्यासाठी जाऊ शकत न्हवत्या. या कठीण काळात कुटुंबाचे पोट कसं भरायचे? याची काळजी त्यांना भेडसावत होती. त्यांचे बहुतांश उत्पन्न हे सुका कचरा, भंगार वेचून आणि ते विकून त्यांना मिळते. मात्र देशात सुरु असलेल्या टाळेबंदीमुळे सर्व दुकाने, हॉटेल्स, मॉल्स, भंगारची दुकाने बंद पडली आहेत. सर्व व्यवहार ठप्प झाले आहे. कामासाठी घराबाहेर पडल्याने त्यांना पोलिसांकडून अनेक प्रकारच्या छळाचा सामना करावा लागला. कचरा वेचकांना अन्नाची कमतरता असल्यामुळे उपासमारीला तोंड द्यावे लागले. त्यांच्याकडे औषधोपचार घेण्याइतपत देखील पैसे न्हवते. आरोग्य सेवांसाठी त्यांना अनेक प्रकाच्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

कचरा गोळा करणे, त्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि पुनर्वापर हे काम सोपे काम नाही परंतु यामुळे कचरा वेचकांच्या दैनंदिन गरजा भागविल्या जातात व त्यांच्या पोटाची खळगी भरली जाते. मात्र या कोरोना विषाणूच्या या साथीच्या रोगाने सर्व कचरा वेचकांचे जीवन व्यथित केले आहे. टाळेबंदीत संपूर्ण वाहतूक व्यवस्था बंद असल्याने कचरा वेचकांना कचरा

वेचण्यासाठी जाण्यास अडचणी निर्माण झाल्या. संसर्गाच्या भीतीने अनेक ठिकाणी कचरा वेचकांना कचरा गोळा करण्यासाठी बंदी घातली गेली. दररोज कचऱ्याच्या पुनर्वापरावर अवलंबून असलेल्या कचरा वेचकांसाठी त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी देखील पुरेसे पैसे नसतात. सध्याच्या कोरोना काळात कचरा वेचणे आणि तो कचरा हाताळून त्याचे वर्गीकरण करणे हे त्यांच्या आरोग्यास धोकादायक ठरू शकते. भंगार विक्रेतेही व्यवसायासाठी बंद असल्यामुळे कचरा वेचकांपुढे कुठलाच पर्याय नाहीये. अशा तऱ्हेने अनेक परिणाम या कचरा वेचक महिलांवर झाले.

**कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे कचरा वेचक महिलांसमोर निर्माण झालेल्या समस्या :**

१) कचरा वेचक महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला.

२) कचरा वेचक महिलांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली.

३) आयुष्यात पहिल्यांदाच त्यांना पैसे कमाविताना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागले.

४) सर्व व्यवहार नियमित सुरु होईपर्यंत 'आम्ही करायचे काय?' असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला.

५) संसर्गाच्या भीतीने कचरा वेचकांना कचरा वेचण्यासाठी मनाई केली गेली.

६) कचरा वेचकांना अशा अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मानसिक ताण-तणावाला सामोरे जावे लागले.

७) कोरोना विषाणू आणि टाळेबंदीत कचरा वेचकांचे संपूर्ण जीवन विस्कळीत झाले.

**निष्कर्ष :**

कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणि टाळेबंदीचे सर्वाधिक दुष्परिणाम समाजातील सर्वात खालच्या स्तरांतील लोकांवर झाले. असंघटित कचरा वेचक महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे. कारण त्यांना टाळेबंदीचा सर्वात मोठा फटका बसला.बेरोजगारीमुळे या महिलांपुढे दारिद्र्याची स्थिती उभी राहिली त्यामुळे त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयावर उपासमारीची वेळ आली. त्यामुळे संकटकाळात ओढवलेल्या परिस्थितीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN No. 2454-8731

**संदर्भ :**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन आणि अभ्यासकेंद्र, पुणे विद्यापीठ : कागद, काच, पत्रा वेचणाऱ्या कष्टकरी महिलांसाठी जाणीव जागृती शिबीर अहवाल, दि. २६ जानेवारी, २००७

२) आगलावे, प्रदीप, २०११, भारतीय समाज संरचना आणि समस्या , नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन

३) सकाळ २५ मार्च, २०२०

४) महाराष्ट्र टाइम्स, २६ मार्च, २०२०

५) महाराष्ट्र टाइम्स, ८ एप्रिल २०२०

६) बीबीसी १९ एप्रिल २०२०

७) सकाळ, २७ जून २०२१


Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN No. 2454-8731